कोवीड-१९ तपासणीसाठी राज्यातील एनएबीएल व आयसीएमआर मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून रॅपीड ॲन्टीबॉडी टेस्ट तपासणीसाठी कमाल दर निश्चित करणेबाबत....

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः को रोना-२०२०/प्र.क्र.१२३/आरोग्य- ५**
गो.ते. रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ००१
दिनांक: ०७ ऑगस्ट, २०२०

**संदर्भ:-**

१) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ०२.०६.२०२०.

२) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन परिपत्रक, क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२७/औषधे-२, दिनांक २३.०६.२०२०.

३) शासन निर्णय समक्रमांक दिनांक ११.०७.२०२०.

४) आयसीएमआरच्या दिनांक २२.०५.२०२० व दिनांक २३.०६.२०२० च्या मार्गदर्शक सूचना.

**प्रस्तावना :-**

संदर्भ क्र. १ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार भारतीय आयुर्विज्ञान संस्था व एनएबीएल मान्यता प्राप्त खाजगी प्रयोगशाळांकडून कोवीड-१९ साठी असलेल्या आरटीपीसीआर तपासणीचे दर निश्चिती करण्यासाठी समिती गठित करण्यात आली होती.

संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या परिपत्रकानुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने राज्यात कोवीड चाचण्याच्या बळकटीकरणासाठी आयसीएमआर व केंद्र शासनाच्या मानकानुसार रॅपीड ॲन्टीबॉडी टेस्ट, ELISA व CLIA टेस्टच्या वापराबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. तथापि, राज्यात या चाचण्यांच्या दर आकारणीबाबत एकसुत्रता व सुस्पष्टता आणणे आवश्यक होते.

यास्तव संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय आयुर्विज्ञान संस्थेने शिफारस केलेल्या विविध कंपन्यांनी उत्पादित केलेल्या रॅपिड ॲन्टीबॉडी चाचण्या यांच्या वापराबाबत शिफारस करणे तसेच शिफारस केलेल्या चाचण्यांच्या अनुषंगाने प्रसिध्द करावयाच्या अभिव्यक्ती स्वारस्याचा मसुदा तयार करणे, सदर चाचण्या कशाप्रकारे कराव्यात याची शिफारस करणे इ. बाबी निश्चित करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती.

सदर समितीने आयसीएमआर मान्यताप्राप्त उत्पादकांच्या ELISA, CLIA या रॅपीड ॲन्टीबॉडी डिटेक्शन टेस्ट व रॅपीड ॲन्टीजेन डिटेक्शन टेस्ट यांची अचुकता, उपलब्धता तपसणीसाठी लागणारा कालावधी या निकषांवर गुणवत्ता ठरवून त्यांचा कोणकोणत्या स्तरावर कोणत्या तपासणीचा वापर करावा याबाबतचा तांत्रिक अहवाल आपल्या शिफारशीसह शासनास सादर केला. शासनाने सदर अहवाल स्विकृत केला आहे. आता या

Scanned with CamScanner

चाचण्यांचे कमाल दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासन आता खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

खाजगी प्रयोगशाळांनी कोवीड-१९ साठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान संस्थेने मान्यता प्रदान केलेल्या उत्पादकांच्या रॅपीड अॅन्टी बॉडी टेस्ट व रॅपीड अॅन्टीजेन टेस्ट वापरणे बंधनकारक आहे. महाराष्ट्र राज्यात साथरोग नियंत्रण कायदा, १८९७ अंतर्गत सक्षम अधिकाऱ्याच्या निर्देशानुसार या तपासण्याचे खालीलप्रमाणे कमाल दर निश्चित करण्यात येत आहेत. राज्यातील कोणत्याही खाजगी प्रयोगशाळेला या दरांपेक्षा अधिक दर आकारता येणार नाहीत.

| तपासणी चा प्रकार | दर आकारणी सर्व करांसहित (रूपयात) | | |
|---|---|---|---|
| | रुग्ण स्वत: प्रयोगशाळेत तपासणीसाठी आल्यास | तपासणी केंद्रावरून अथवा एकत्रित तपासणी नमुने घेतल्यास | रुग्णाच्या घरी जाऊन तपासणीसाठी नमुना घेतल्यास |
| ELISA for Antibodies Test | ४५०/- | ५००/- | ६००/- |
| CLIA for Antibodies Test | ५००/- | ६००/- | ७००/- |
| Rapid Antigen Test | ६००/- | ७००/- | ८००/- |

सदर आदेश हा निर्गमित केल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००८०७१५३३२६८८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ARCHANA VILAS WALZADE

Digitally signed by ARCHANA VILAS WALZADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b17094004b015083dae757656e5d24847898197ddd6b0366a9177f097ed0887a, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=b4e19876ab3eec36e3a3b988441648ab8747 0cdfe66b14cfbe7ac9bd770485c1, ou=PUBLIC HEALTH DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ARCHANA VILAS WALZADE
Date: 2020.08.07 16:11:55 +05'30'

अर्चना वालझाडे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन



Scanned with CamScanner

प्रत,

१. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

३. जिल्हाधिकारी (सर्व).

४. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,(सर्व)

५. महानगरपालीका आयुक्त (सर्व)

६. संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे

७. मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

८. मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

९. मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ]



Scanned with CamScanner